उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १४ /२०२६ दि. १३/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषगाने दिनाक १४/१/२०२६ रोजी ईव्हीएम मशिन वाटप करण्याची प्रक्रिया, दिनांक १५/१/२०२६ रोजी ईव्हीएम मशिन जमा करणे व दिनांक १६/११/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया मा. प्रांतअधिकारी कार्यालय, पवई चौक, उल्हासनगर–३ येथे होणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** शास्त्री चौक उल्हासनगर –३ येथुन हिराघाट –पवई चौक मार्गे उल्हासनगर ४,५ व विठ्ठलवाडी, कोळसेवाडी कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **शास्त्री चौक, उल्हासनगर–३** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने शास्त्री चौक उल्हासनगर–३ येथुन कल्याण रोडने सरळ छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार–सम्राट चौक येथुन डावी कडे वळुन धर्मविर आनंद दिघे ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील
प्रवेश बंद –	**२)** उल्हासनगर ४,५ व विठ्ठलवाडी कडुन पवई चौक उल्हासनगर–३ मार्गे प्रांत कार्यालय – हिराघाट चे दिशेने येणाऱ्या सर्व वाहनांना पवई चौक उल्हासनगर–३ येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने पवई चौकातुन डावी कडे वळुन –प्रकाश ऑटो मोबाईल समोरून–हडकाई माता चौक– स्मशानभुमी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. १४/०१/२०२६ रोजी सकाळी ५.०० वाजेपासुन दिनांक १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर च
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे
प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर वाहतूक शाखा.
२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.